# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/सनिंस/कार्यासन-१/टे.सी-३/सन २०१५/२३३९
सहकार कक्ष, झो.पु.प्रा., मुंबई
दिनांक : ३१/१२/२०१५.

परिपत्रक क्रमांक : १६९

विषय : पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांची सर्वसाधारण सभा, संस्थांची नोंदणी याबाबतची कार्यपध्दती.

संदर्भ : प्राधिकरणाकडील संस्था नोंदणी व सर्वसाधारण सभेबाबत निर्गमित करण्यात आलेली परिपत्रक क्रमांक २०, ५७, ५९, ७२, ८०, १२०, १४८ व १५१.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना स्विकारलेल्या नियोजित सहकारी संस्थांचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनूसार नोंदणी, प्राधिकरणाकडील परिपत्रकीय सूचनांप्रमाणे त्यांच्या घ्यावयाच्या सर्वसाधारण सभा व सदरील सभांची कार्यपध्दती याबाबत यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. २०, ५७, ५९, ७२, ८०, १२०, १४८ व १५१ हे रद्द करुन सदरील कार्यपध्दतीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी एकत्रित सुधारित कार्यपध्दती सदरील परिपत्रकाद्वारे निश्चित करण्यात येत आहे.

अ) नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे विकासक व वास्तुविशारद यांची नियुक्ती करण्यात येवून प्राधिकरणाच्या कार्यपध्दतीनुसार नविन झोपडपट्टी पुनर्वसन प्रस्ताव दाखल करण्यात येतो.

सदरील प्रस्ताव स्विकारल्यानंतर योजनेतील झोपडीधारकांची गृहनिर्माण संस्था नोंदणी होईपर्यंत सदरील नियोजित संस्था कार्यरत असते त्या नियोजित संस्थेच्या कामकाज पारदर्शकपणे पार पाडावे यासाठी सदरील नियोजित संस्थेने दरवर्षी ३० सप्टेंबर पूर्वी योजनेतील मसुदा परिशिष्ट- २ मधील झोपडीधारकांची सर्वसाधारण सभा सोबतच्या जोडपत्र- अ मधील विशेष सूची व कार्यपध्दतीनुसार घेणे त्यांना बंधनकारक राहील. त्याचबरोबर सदरील सभेची नोटीस व सभेचा कार्यवृत्तांत प्राधिकरणाच्या सहकार विभागात दाखल करणे बंधनकारक राहील.

ब) परिशिष्ट- २ निर्गमित केल्यानंतर पुनर्वसन योजनेतील सहकारी गृहनिर्माण संस्थांचे नांव आरक्षण व नोंदणीपूर्व सर्वसाधारण सभेचे आयोजन सहकार कक्षामार्फत प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करुन जोडपत्र ब मध्ये नमुद केलेल्या विषय पत्रिकेवर निर्णय घेण्यासाठी करण्यात येईल.

एका योजनेच्या परिशिष्ट- २ मध्ये एकापेक्षा अधिक नियोजित गृहनिर्माण संस्थांचे सभासद त्यांच्या संस्थानिहाय दर्शविलेले असल्यास प्रत्येक संस्थेसाठी स्वतंत्र सभा आयोजित करण्यात येईल.

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७ ई-मेल info@sra.gov.in

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

सदरील सभेची कार्यक्रम पत्रिकेतील विषय क्र. १ बाबत गुप्त मतदान झाल्यानंतर सभेचे अध्यक्ष स्थान नवनिर्वाचित मुख्यप्रवर्तक यांचे राहील व प्राधिकृत अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित राहतील.

सदरील सभा झाल्यानंतर सहकार कक्षातर्फेत नियोजित संस्थेच्या नांव आरक्षणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल व संस्थेस बँक खाते उघडण्यास परवानगी देण्यात येईल.

क) उपरोक्त ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे नांव आरक्षणास मंजूर दिल्यानंतर पुनर्वसन योजनेच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी विहीत कालावधीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनूसार सहकार कक्षातर्फे करण्यात येईल.

ड) पुनर्वसन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असल्यास नोंदणीकृत किंवा नियोजित संस्थेची सर्वसाधारण सभा प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत बोलविता येतील.

इ) नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व संस्थेची उपविधी यातील तरतुदीनूसार त्यांच्या विशेष सर्वसाधारण सभा घेण्यास स्वतंत्र राहतील. परंतु, त्यांच्या ३० सप्टेंबरपूर्वी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामाचा आढावा हा विषय बंधनकारक राहील.

ई) प्राधिकरणामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व सर्वसाधारण सभा सोबत जोडपत्र- क मधील कार्यपध्दतीनुसार आयोजित करण्यात येतील व सदरील सभेचा खर्च प्राधिकरणामार्फत करण्यात येईल व त्यानंतर योजनेच्या विकासकाकडून ती रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वसुल करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.

(जोडपत्र- अ)

**(नियोजित) ------------------------------ एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था**

पत्ता : ---------------------------------------------------------------------------------

## <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u>

आपल्या नियोजित संस्थेने दाखल केलेला पुनर्वसन प्रस्ताव प्राधिकरणाने स्विकारलेला असून योजनेच्या परिशिष्ट- २ चे काम सुरु आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. ------ नुसार संस्थांची सर्वसाधारण सभा दिनांक ------------- रोजी सकाळी / सायंकाळी ----------- वाजता पत्ता : ------------------------------------ -------------------- येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

सदरील सभेत खालील विषयावर चर्चा होवून निर्णय घेण्यात येणार आहे. तरी सदर सभेत उपस्थित रहावे ही विनंती.

### - : <u>सभेचे विषय</u> : -

१) पुढील वर्षासाठी मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड करणे.
२) पुनर्वसन योजनेच्या कामकाजाची माहिती सभासदांना सादर करणे.
३) योजनेच्या परिशिष्ट- २ च्या सद्यस्थितीबाबतची माहिती सभासदांना देणे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : / /

सही/-
मुख्यप्रवर्तक
(नांव : )

प्रति,
श्री. / श्रीमती. ------------------------------------------- पत्ता -----------------------------
-------------------------------------------------------------------------------------------

**प्रत माहितीसाठी,**
मा. सहनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई- ४०० ०५१.

सभेची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील :

१) सभेची नोटीस किमान सात दिवसांपूर्वी मसुदा परिशिष्ट मधील झोपडीधारकांना / प्राधिकरणास देणे आवश्यक राहील.
२) सदरील सभेची नोटीस किमान एका स्थानिक वर्तमानपत्रात छापून प्रसिध्द करावी.

३) सभेचा कार्यवृत्तांत सभा झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत प्राधिकरणाकडे सादर करावा.

४) सभेस मसुदा परिशिष्टमधील एका कुटुंबातील पती अथवा पत्नी यांना प्रवेश द्यावा. त्यापेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश देवू नये.

५) सभेची उपस्थिती शक्यतो बायोमॅट्रीक पध्दतीने नोंदवावी.

६) सभेच्या कामकाजाचे व्हिडीयो चित्रीकरण करण्यात यावे.

७) सभासदांनी मागणी केल्यास मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड गुप्त मतदान पध्दतीने करण्यात यावी.

(जोडपत्र- ब)

**(नियोजित) ------------------------------ एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था**

**पत्ता : -------------------------------------------------------------------------------------------**

## <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u>

आपल्या संस्थेचे परिशिष्ट- २ सक्षम प्राधिकारी यांनी दिनांक ----------------- रोजी निर्गमित केलेले असून सदरील परिशिष्ट-. २ मध्ये पात्र असणाऱ्या झोपडीधारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी नोंदणीपूर्व सभा घेण्यासाठी मा. सहनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झो.पु.प्रा. यांच्या दिनांक ------------------ रोजीच्या आदेशान्वये माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार योजनेतील पात्र झोपडीधारकांची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक -------------------- रोजी सकाळी / सायंकाळी ----------- वाजता पत्ता : ---------------------------------------------------- येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

सदरील सभेत खालील विषयावर चर्चा होवून निर्णय घेण्यात येणार आहे. तरी सदर सभेत उपस्थित रहावे ही विनंती.

-: <u>सभेचे विषय</u> :-

१) मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड करणे.
२) नियोजित संस्थेच्या नावास मान्यता घेणे व नांव आरक्षण प्रस्ताव दाखल करणेबाबत निर्णय घेणे.
३) संस्थेसाठी नविन उपविधी स्विकारण्यासाठी मंजूरी देणे.
४) संस्थेच्या नोंदणी प्रस्तावावर सहया करण्यासाठी मुख्यप्रवर्तक यांना अधिकार देणे.
५) भाग भांडवल व प्रवेश फी जमा करणेबाबत निर्णय घेणे.
६) संस्थेचे बँक खाते उघडण्यास मुख्यप्रवर्तक यांना प्राधिकृत करणे.
७) मागाहून पात्र होणाऱ्या झोपडीधारकांना संस्थेचे सभासद करुन घेणे अथवा अपात्र झोपडीधारकाचे सभासदत्व रद्द करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास देणे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : / /

( )
प्राधिकृत अधिकारी तथा
-----------------------------------

सूचना :

१) मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक निवडणूकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | वेळ | विषय |
|---|---|---|
| १) | सभेच्या दिलेल्या वेळेपासून २ तास | मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांच्यासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करणे. |
| २) | १५ मिनिटे | आलेल्या अर्जाची छाननी करणे. |
| ३) | १५ मिनिटे | नामनिर्देशन पत्र परत घेणे. |
| ४) | १५ मिनिटे | पॅनलची मागणी करणे. |
| ५) | पुढील अर्धातास | चिन्ह वाटप करणे. |

२) मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक या पदासाठीचे विहीत अर्ज प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असतील.

३) मुख्यप्रवर्तक पदासाठी एक मतपत्रिका व प्रवर्तक मंडळातील सदस्यांसाठी एक मतपत्रिका अशा एकूण ०२ मतपत्रिका राहतील.

४) विषय पत्रिकेवरील विषय क्र. १ नुसार मुख्यप्रवर्तकाची निवड होईपर्यंत सभेचे प्राधिकृत अधिकारी अध्यक्ष म्हणून काम पाहतील त्यानंतर मुख्यप्रवर्तक हे सभाअध्यक्ष म्हणून काम पाहतील. (सदरील सभेत विषयपत्रिकेवर दिलेल्या विषयाशिवाय अन्य विषयावर चर्चा करता येणार नाही)

५) सभेस नियोजित संस्थेच्या मंजूर परिशिष्ट- २ मधील पात्र झोपडीधारक पती / पत्नी या दोघांपैकी एकाच व्यक्तीस उपस्थित राहता येईल. इतर नातेवाईकांना अथवा प्रतिनिधींना उपस्थित राहता येणार नाही.

६) मंजूर परिशिष्ट- २ मधील व्यक्तींनी स्वतःची ओळख होईल अशा ओळखपत्रासह (आधार कार्ड / निवडणूक ओळखपत्र / पॅनकार्ड इत्यादी) उपस्थित रहावे.

७) संस्थेच्या पात्र सभासदांना सभागृहात प्रवेश देतेवेळी त्यांनी त्यांची ओळख पटवून सभेच्या उपस्थिती नोंदवहीत स्वाक्षरी करुन व बायोमेट्रीक पध्दतीने उपस्थिती नोंदविल्यानंतरच सभागृहात प्रवेश दिला जाईल

८) सभेच्या कामकाजाचे प्राधिकरणामार्फत व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येईल.

प्रति,

श्री. / श्रीमती. ------------------------------------------ पत्ता ------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

प्रत माहितीसाठी,

मा. सहनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई- ४०० ०५१

टिप :

मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची एकूण संख्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आदर्श उपविधीमध्ये निश्चित केल्याप्रमाणे राहील.

(जोडपत्र - क)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या झोपडीधारकांच्या नियोजित/नोंदणीकृत संस्थांच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

१) सभेसाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे.

सदरील सभा घेण्याचे निश्चित झाल्यानंतर सहकार कक्षातर्फे सदरील सभेसाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

प्राधिकृत अधिकारी हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहकार कक्षातील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी अथवा महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागातील कार्यरत अथवा निवृत्त राजपत्रीत अधिकारी असावा.

२) प्राधिकृत अधिकारामार्फत करावयाची कामे :

२.१ प्राधिकृत अधिकारी यांच्या नियुक्ती नंतर सर्वसाधारण सभा घेण्यासाठी त्या संबंधीत झोपडपट्टीच्या परिसरातील अथवा नजीकच्या ठिकाणी सभेसाठी आवश्यक असणारे सभागृह अथवा ठिकाण निश्चित करावे.

२.२ सदरील परिपत्रकातील जोडपत्र ' ब ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे सभेची नोटीस काढण्यात यावी. सदरील नोटीस सभेच्या किमान पुर्ण १४ दिवसांची असावी. (नोटीस काढल्याचा दिनांक व सभेचा दिनांक वगळुन १४ दिवस).

२.३ सदरील योजनेतील सर्व पात्र सभासदांना त्यांच्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद असणाऱ्या पत्त्यावर कुरिअर द्वारे अथवा स्पीडपोस्ट द्वारे नोटीस पाठविण्यात यावी.

२.४ सदरील नोटीस सभेच्या किमान ७ दिवसांपुर्वी दोन स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात यावी. (एक मराठी व एक हिंदी वर्तमान पत्र).

२.५ झोपडपट्टी संस्थेचे कार्यालय असणाऱ्या नोटीस बोर्डवर सदरील नोटीस लावण्यात यावी.

२.६ सभेसाठी आवश्यक ते पोलिस बंदोबस्त मिळणेसाठी संबंधीत पोलिस स्टेशनला विनंती पत्र देण्यात यावे. तसेच आवश्यक असल्यास बंदोबस्तसाठी लागणारे शुल्क संबंधीत पोलिस टाण्यात जमा करावे.

२.७ सभेचे व्हिडिओ शुटींग व बायोमेट्रीक पध्दतीने नोंदविण्यासाठी प्राधिकरणामार्फत नियुक्त केलेल्या एजन्सीला लेखी पत्र देऊन सभेची माहिती देण्यात यावी व त्याची लेखी संमती सभेपुर्वी घ्यावी

२.८ सभेसाठी आवश्यक असणारे कर्मचारी व त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढावेत. ( सदरील सभेसाठी प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचारी व आवश्यकता असल्यास प्रमाणित लेखापरिक्षक, प्रशासक पॅनलवरील व्यक्ती, निवृत्त राज्य शासनाचे कर्मचारी व गृहनिर्माण संस्थेत काम करणारे कर्मचारी व व्यवस्थापक इत्यादी मधुन कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत.)

२.९ सभेसाठी आवश्यक असल्यास खाजगी सुरक्षा रक्षक तसेच सुरक्षाच्या दृष्टीने वस्तुशोधक यंत्र (Metal Detector) अथवा अन्य उपकरणे भाडयाने घेता येतील.

३) सभेच्या विषयाचे कामकाज :

३.१ सभेस उपस्थित राहणाऱ्या पात्र व्यक्तींकडे शासनमान्य फोटो असलेले ओळखपत्र तपासून सभेच्या ठिकाणी प्रवेश देण्यात येईल.

३.२ सभेची उपस्थिती बायोमेट्रीक पध्दतीने नोंदविणे व सभेच्या संपुर्ण कामकाजाचे व्हिडिओ चित्रीकरण करणे बंधनकारक राहील.

३.३ सभेची गुप्त मतदान प्रक्रिया राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांच्या कार्यपध्दतीनुसार अवलंबण्यात यावे.

३.४ मतदानानंतर मतमोजणी सभेच्या ठिकाणी व सभेच्या दिवशी करण्यात यावी.

४) सभेनंतरचे कामकाज :

सभेचा कार्यवृत्तांत सभा झाल्यापासून ७ दिवसांच्या आंत संबंधीत निबंधकांकडे सादर करावा.

५) सदरील सभेसाठी झालेला खर्च योजनेस पुढील परवानगी देण्यासाठी संबंधीत विकासकाकडुन वसुन करण्यासाठी अभियांत्रिकी विभागाशी संबंधीत विभागातील फिरती अधिकारी यांनी समन्वय साधावा